follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २७१ ✻ सातारा ✻ सातारा ✻ मंगळवार ✻ दि. ११ जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/


# उध्दव ठाकरेंचे मिशन विधानसभा !

## ताकदीने कामाला लागा; पदाधिकाऱ्यांना दिले आदेश



**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुका महाविकास आघाडी एकत्रीतपणे लढणार आहे. त्यामुळे २८८ मतदार संघात संघटनात्मक बांधणी करून ताकदीने कामाला लागा, अशा सूचना शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुख, पदाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती खासदार संजय राऊत यांनी दिली. सोमवारी विधानसभेची रणनिती ठरवण्यासाठी दादर येथील शिवसेना भवनात ठाकरेंच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. दरम्यान, लोकसभा निवडणुकीचा निकालावर मंथन आणि येणाऱ्या विधानसभा मतदारसंघ निहाय आढावा घेण्यात आला. शिवसेना नेते, युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे, दिवाकर रावते, खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई, आमदार अनिल परब आदी राज्यभरातील जिल्हाप्रमुख आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीने तब्बल ३१ जागा जिंकल्या. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेते आणि कार्यकत्यांमध्ये उत्साह वाढला आहे. राज्यात मागील वेळी २३ जागा जिंकणा-या भाजपला अवघ्या ९ जागा मिळाल्याने लोकसभा निवडणुकीत भाजपचे पानीपत झाले आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपचा दारूण पराभव करण्यात महाविकास आघाडीला यश आल्याने आता महाविकास आघाडी विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागली आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरूवात केली आहे. शिवसेनेचे (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी त्याअनुषंगाने बैठक घेत कार्यकत्यांना संबोधित केले.

उद्धव ठाकरे विधानसभा निवडणुकांपूर्वी महाराष्ट्रभर दौरा करणार आहेत. यावेळी बैठकीत संघटनात्मक बांधणीच्या अनुषंगाने आणि विधानसभेच्या दृष्टीने पूर्वतयारीवर भर देण्यात आला. त्यानुसार २८८ मतदारसंघात संघटनात्मक बांधणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षक आणि पदवीधर मतदार संघातील निवडणुकीबाबत रणनिती आखण्यात आली. आता पावसाळा सुरू झाल्याने जाहीर सभांऐवजी राज्यभरात इनडोअर मेळावा किंवा बैठका घेतल्या जातील, असे राऊत यांनी सांगितले.

१८० ते १८५ जागा जिंकू : राऊत

महाविकास आघाडी सोबत शिवसेनेचे बालेकिल्ले असलेल्या भागात पदाधिकाऱ्यांनी जोर लावावा. अधिक ताकदीने आणि मजबुतीने संघटनात्मक बांधणी करावी. आघाडीत वाट्याला येणाऱ्या जागा लढू या. लोकसभेत फटका बसलेल्या जागांवर पुन्हा मतांचा टक्का वाढवा. सर्वाधिक उमेदवार जिंकून या निवडणुकीत येतील, यासाठी सर्वांनी झोकून देऊन काम करा, अशा सूचना ठाकरेंनी दिल्या आहेत. तसेच येत्या विधानसभा निवडणुकीत आघाडीला १८० ते १८५ जागा जिंकू, असा निर्धार ही शिवसेनेच्या बैठकीत करण्यात आल्याचे राऊत म्हणाले.

### मंत्रिपदावरून शिंदे गटातील खासदारांनी व्यक्त केली नाराजी

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचा स्ट्राईक रेट पाहता शिंदे गटाला एक तरी कॅबिनेट मंत्री पद दिले जाणे आवश्यक होते. प्रत्यक्षात राज्यमंत्री पद देऊन शिंदे गटाच्या सन्मानाला ठेच पोहोचविण्यात आली आहे, अशी खंत शिंदे गटाचे नवनिर्वाचित खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केली आहे.

या लोकसभा निवडणुकीत विशेषतः महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशात भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्र पक्षांना अपेक्षित कामगिरी करताना आल्यामुळे केंद्रात मोठी पीछेहाट झाली आहे. स्वबळावर बहुमत मिळवताना आल्यामुळे सत्ता स्थापनेसाठी मित्र पक्षांची मनधरणी करण्याची वेळ भाजपावर आली आहे. विशेषतः संयुक्त जनता दल आणि तेलगू देसम या मित्र पक्षांच्या कुबड्यांवर हे सरकार अवलंबून राहणार आहे. या पार्श्वभूमीवर इतर मित्र पक्षांची मनधरणी केली जात असताना महाराष्ट्रात खंबीरपणे साथ देणारा शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचा योग्य सन्मान राखला जात नसल्याची बारणे यांना खंत आहे.

## कोल्हापुरातील विजयानंतर छत्रपती शाहू महाराज मातोश्रीवर

**कोल्हापूर :** कोल्हापूर लोकसभेला मिळालेल्या झंझावाती यशानंतर श्रीमंत शाहू छत्रपती (१० जून) मातोश्रीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी पोहोचले. यावेळी उद्धव ठाकरे यांच्याकडून शाहू महाराज यांचे जोरदार स्वागत व आदरातिथ्य करण्यात आले. शाहू महाराजांच्या स्वागतासाठी उद्धव ठाकरे यांच्यासह रश्मी ठाकरे आणि आदित्य ठाकरे उपस्थित होते.



शाहू महाराज छत्रपती यांनी काँग्रेस आमदार सतेज पाटील आणि माजी आमदार मालोजीराजे छत्रपती यांच्यासह मातोश्रीवर उद्धव ठाकरेंची भेट घेतली. या भेटीमध्ये उद्धव ठाकरे यांनी शाहू महाराजांना शुभेच्छा दिल्या. कोल्हापूर लोकसभा हा पारंपारिक ठाकरे गटाचा मतदारसंघ आहे. मात्र, शाहू महाराजांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी ही शाहू महाराज यांच्यासाठी काँग्रेसला सोडली होती. काँग्रेसकडून शाहू महाराज यांनी महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांचा एक लाख ५४ हजारांवर मतांनी पराभव केला.

कोल्हापूर लोकसभेला शाहू महाराज यांची उमेदवारी निश्चित झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी कोल्हापूर दौऱ्यात राजवाड्यावर जात अभिनंदन केलं होतं. तसेच विजयाचा निर्धार सुद्धा व्यक्त केला होता. त्यानंतर कोल्हापुरात गांधी मैदानामध्ये झालेल्या शिव शाहू निर्धार सभेला सुद्धा उद्धव ठाकरे यांनी संबोधित करत शाहू महाराजांच्या विजयासाठी आवाहन केले होते.

## विधानसभेत शिंदेंच्या शिवसेने एवढ्याच जागा पाहिजे ; छगन भुजबळ

**मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीला ठेच लागली आहे, हे आपल्याला नाकारून चालणार नाही. यापुढील काळात आपल्या रस्त्यातील दगड धोंडे बाजूला सारून पुन्हा ठेच लागणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. या निवडणुकीत जो समाज आपल्यापासून दुरावला गेला आहे त्याच्यामध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी फुले, शाहू आंबेडकरांचे विचार आपल्याला कृतीतून दाखवावे लागतील असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. दरम्यान विधानसभेत एकनाथ शिंदे यांच्या एवढयात जागा मिळायला हव्यात अशी मागणी भुजबळ यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आज षण्मुखानंद सभागृह मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २५ वा वर्धापनदिन सोहळा पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, मंत्री धनंजय मुंडे, मंत्री अनिल भाईदास पाटील, मंत्री संजय बनसोडे, मंत्री अदिती तटकरे, मुंबई अध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ, महिला प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर, सर्व विधिमंडळ सदस्य,माजी आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार देविदास पिंगळे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, मुंबई शिक्षक मतदारसंघ राष्ट्रवादीचे उमेदवार शिवाजीराव नलावडे, युवक अध्यक्ष सूरज चव्हाण, बाबा सिद्दीकी,मुश्ताक अंतुले,नरेंद्र राणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हा फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारधारेवर काम करणारा पक्ष आहे. त्यामुळे सर्वच जाती घटकातील लोकांना सोबत घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. ज्या विचारांवर आपण काम करत आहोत ते विचार प्रत्यक्ष कृतीतून आपल्याला दाखवून द्यावे लागतील त्यातून राज्यातील सर्व घटकांच्या मनात आगामी काळात आपल्याला विश्वास निर्माण करावा लागेल. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत घटना बदलली जाईल असा अपप्रचार झाल्याने दलित, मुस्लिम,आदिवासी यासह अल्पसंख्यांक, भटके विमुक्त समाज हा महायुती पासून काही अंशी दूर गेला. त्याचा फटका आपल्याला बसल्याचे चित्र आपल्याला बघावयास मिळाले. आगामी काळात हे चित्र आपल्याला बदलावे लागणार आहे. त्यासाठी दलित मुस्लिम आदिवासी भटके विमुक्त अल्पसंख्यांक अशा सर्व समाजाला आगामी विधानसभा निवडणुकीत आपल्याला संधी द्यावी लागेल असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की महायुती सरकारने मुंबईसारख्या शहरांमध्ये हजारो कोटी रुपयांची कामे केली आणि अनेक कामे सुरू असून देखील नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला मुंबईमध्ये मोठा फटका बसला आहे, याची खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच कोण आपल्यापासून दुरावला गेला आहे याचं आत्मचिंतन होण्याची आवश्यकता असून नेमका आजार काय झाला आहे त्यावर औषध शोधलं तर यश आपल्याला नक्कीच असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. राज्यातील मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण महायुती सरकारने दिले आहे आणि हे आरक्षण टिकणार आहे. तरी देखील काही लोकांकडून चुकीच्या पद्धतीने प्रचार केला जात आहे. त्यांना समजून सांगण्याची आवश्यकता असून राज्यातील सर्व समाज हा एकसंघ असून उगाच ओबीसी मराठा असा वाद निर्माण होणार नाही याची दक्षता देखील घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

## विधानसभा निवडणुकीत अधिक फजिती होईल

### जरांगे पाटील यांचा सत्ताधाऱ्यांसह काँग्रेसला इशारा

**जालना :** आरक्षणाबाबतच्या मागण्या मान्य न झाल्यामुळे काय फजिती होते, हे या निवडणुकीत दिसून आले आहे. मराठा आरक्षणाबाबत दुटप्पी भूमिका कायम ठेवल्यास विधानसभा निवडणुकीत अधिक मोठी फजिती होईल, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सत्ताधारी आणि काँग्रेसला दिला आहे.

जालना लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री आणि भाजपचे दिग्गज नेते रावसाहेब दानवे यांना धूळ चारणारे काँग्रेसचे नवनिर्माचित खासदार कल्याण काळे जरांगे पाटील यांच्या भेटीला गेले असता त्यांनी माध्यमांसमोर बोलताना हा इशारा दिला. या लोकसभा निवडणुकीत विशेषतः मराठवाड्यात महायुतीला जरांगे फॅक्टरचा मोठा धक्का बसला आहे

सगे सोयऱ्यांच्या नियमांची अंमलबजावणी करा, या प्रमुख मागणीसह मराठा आरक्षणाशी संबंधित अन्य मागण्यासाठी जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलन सुरू केले आहे. सरकारने आश्वासने देऊन आमच्या तोंडाला पाणी पुसू नये. आंदोलन काळातच आमच्या मागण्या मान्य कराव्या. बाकी आमची कोणतीही अपेक्षा नाही. मराठा युवकांच्या भवितव्यासाठी आम्ही आमचा जीव पणाला लावला आहे., असे जरांगे पाटील यांनी सांगितले.

### NEET परिक्षेतील घोटाळ्याची चौकशी करून निकालाचे फेर मुल्यांकन करा. : नाना पटोले

मुंबई : डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगलेल्या विद्यार्थ्यांना छएएढ परीक्षेत झालेल्या घोटाळ्याचा मोठा फकटा बसला असून त्यांच्या स्वप्नावर पाणी फेरले आहे.

या परिक्षेत गैरप्रकार झाल्याने लाखो विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवरही अन्याय झाला असून सरकारी आणि खासगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळणे कठीण झाले आहे. नीट परिक्षेतील घोटाळा पाहता या प्रकरणाची सर्वंकश चौकशी करावी तसेच निकालाचे फेरमुल्यांकन करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

## उजनी दुर्घटनाप्रकरणी अद्याप गुन्हा नाही

### सामाजिक कार्यकर्ते आक्रमक



**सोलापूर :** लोकसभा प्रचाराची धूम सुरू असताना एका बातमीनं संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला होता. तारीख होती २१ मे वेळ संध्याकाळी साडे पाचची. उजनी जलाशयातील (णक्षरपळ ऊत्र) अवैध प्रवासी वाहतुकीनं या दिवशी सहा निष्पाप जीवांचे बळी घेतले. मात्र, याला तब्बल १९ दिवस उलटूही अजून प्रशासनानं साधा गुन्हा दाखल करण्याचं सौजन्य दाखवलेले नाही. यामुळेच आता सामाजिक कार्यकर्ते चिडून उठले असून त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पत्र लिहिली आहेत. पण त्यांच्याकडूनही दखल न घेतली गेल्यानं आता राष्ट्रीय मानवहक्क विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

करमाळा तालुक्यातील कुगाव येथून इंदापूर तालुक्यातील कळाशी या गावाकडे उजनी जलाशयातून असणाऱ्या शॉर्टकट मार्गानं गेले कित्येक वर्ष प्रशासनाच्या आशीर्वादानं अवैध प्रवासी जलवाहतूक सुरू आहे. याच एका बोटीत झरे येथील गोकुळ जाधव, त्यांची पत्नी कोमल आणि त्यांची २ वर्षांची मुलगी माही, एक वर्षांचा मुलगा शुभम एका धार्मिक कार्यक्रमासाठी जाण्यासाठी उजनी जलाशयावर आले. याचवेळी आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्षांचा मुलगा गौरव डोंगरे आणि त्याचे चुलत बंधू सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे हे देखील कळाशीकडे जाण्यासाठी कुगाव येथील जलाशयावर पोहोचले. त्यावेळी बोट घेऊन कुगाव येथील अनुराग अवघडे आला. यावेळी वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. यातच हे सर्व सहा जण बोटीत बसले आणि बोट कळशीकडे निघाली. मात्र, निम्मं अंतर पार करून जातानाच वादळानं रौद्र रूप धारण केलं आणि जलाशयात मोठमोठ्या लाटा उठायला लागल्या. या लाटेतच बोटीला जलसमाधी मिळाली.

यावेळी पोलीस अधिकारी राहुल डोंगरे यांच्यासह सर्वांनी आपले प्राण वाचवण्याचे प्रयत्न सुरु केले. मात्र, लाटा एवढ्या मोठ्या होत्या की त्यात पोहणं अवघड झालं होतं. यातच पट्टीचा पोहणारा गोकुळ जाधव याच्यासोबत त्याची पत्नी आणि दोन लहान मुले असल्यानं त्यांनी स्वत:पेक्षा आपल्या दोन चिमुरड्यांना वाचवण्याचा प्रयत्न सुरु केला. आईनं मुलीला कवटाळून धरलं तर बापानं मुलाला धरून वाचण्याचा प्रयत्न सुरु केला. मात्र, यात सर्वच अपयशी झाले. सुदैवानं राहुल डोंगरे हे कसेबसे जिवाच्या आकांतानं पोहत पलीकडे असणाऱ्या कळाशी तिराजवळ पोहोचले. त्यांनी आरडा ओरडा केल्यावर त्यांना परिसरात असणाऱ्या ग्रामस्थांनी बाहेर काढलं. यावेळी राहुल यानं बोट बुडाल्याची माहिती ग्रामस्थांना दिल्यावर थोडं वादळ शांत झाल्यावर शोधमोहिमेला सुरुवात झाली. अंधार पडल्यानं रात्री केवळ यात कोमल यांची पर्स आणि लहान मुलांचे साहित्य सापडलं. यानंतर आमदार दत्तात्रय भरणे यांनी एनडीआरएफच्या टीमला पाचारण करण्यासाठी निरोप दिले. सात प्रवाशांपैकी बोट चालकासह सहा प्रवाशांचा पत्ता लागला नव्हता.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच, २२ मे रोजी एनडीआरएफच्या टीमनं सकाळी लवकर शोधकाऱ्याला सुरुवात केली. दिवसभर शोधूनही केवळ ३५ फूट खोल बुडालेली बोट आढळून आली. दुसऱ्या दिवशी सायंकाळी पुन्हा वादळी वारे वाहू लागल्यानं हा तपास थांबवण्यात आला. अखेर २३ मे या दिवशी म्हणजेच, तब्बल ४० तासानंतर पहिल्यांदा लहान मुलांचा मृतदेह फुगून वर आल्यानं या ठिकाणी शोध सुरू केल्यावर एकापाठोपाठ एक असे पाच मृतदेह आढळून आले. थोड्या अंतरावर गौरव डोंगरे याचाही मृतदेह सापडला. यानंतर हे सर्व मृतदेह करमाळा येथे पोस्टमार्टमसाठी हलविण्यात आले आणि संध्याकाळी या सर्व मृतदेहांवर झरे आणि कुगाव येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## लोकसभा निवडणुकीत प्रशासन व्यस्त

### घनसोली अर्जूनवाडीत अनधिकृत बांधकामे जोरात

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिका घनसोली विभाग कार्यक्षेत्रातील अर्जूनवाडी परिसरात महापालिका प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट सुरू आहे.

लोकसभा निवडणुकीत प्रशासनाचे अधिकारी व्यस्त असल्याने त्याचा फायदा घेत अनधिकृत बांधकामे जोरात झाली आहेत.

त्यामुळे या अनधिकृत बांधकामावर पालिका प्रशासनाकडून कधी कारवाई होईल अशीच मागणी होत आहे.

नवी मुंबई महापालिका घणसोली विभाग कार्यालय क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर पालिका प्रशासनाकडून कारवाई करण्यात आलेली आहे.

मात्र गेल्या महिनाभरापासून लोकसभा निवडणुकीच्या कामात पालिका प्रशासनाचे अधिकारी व्यस्त असल्याने त्याचा फायदा उठवीत घनसोली अर्जूनवाडी परिसरात अनधिकृत बांधकाम जोरात सुरू आहेत.

पालिकेची कोणतीही परवानगी न घेता सर्व नियम धाब्यावर बसवित अनधिकृतपणे पाच मजल्याच्या इमारतींची कामे सुरू आहेत. लोकसभा निवडणुकीच्या कामात पालिकेचे सर्व अधिकारी गुंतलेले असल्याने या अनधिकृत बांधकामावर कोणतीही कारवाई होऊ शकलेली नाही.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपली असून घनसोली अर्जूनवाडीतील बांधकामावर पालिका प्रशासनाने धडक कारवाई करावी असा सूर नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## संपादकीय

# मायावतींसाठी धोक्याची घंटा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार तिसऱ्यांदा सत्तेवर आले आहे. त्यांचे मंत्रिमंडळही तयार झाले आहे; परंतु या वेळी देशभरातील भाजपचा वारू रोखण्याचे काम अखिलेश यादव-राहुल गांधी या जोडीने केले आहे. त्यातही उत्तर प्रदेशची सर्वाधिक चर्चा झाली आहे. समाजवादी पक्षाने त्याच्या इतिहासात कधी नव्हे, एवढी चांगली कामगिरी केली आहे. त्याच वेळी देशातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष असलेल्या बहुजन समाज पक्षाने त्याच्या इतिहासात कधी नव्हे, एवढी सुमार कामगिरी केली आहे. सुमार कामगिरीच नव्हे, तर मायावती यांनी स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. त्यांच्या आत्मघाती निर्णयामुळे पक्षाचे अस्तित्व पणाला लागले आहे. देशाने दिलेल्या जनादेशात उत्तर प्रदेशची सर्वाधिक चर्चा होत आहे. तिथे अखिलेश यांनी आश्चर्यकारक कामगिरी केली आहे आणि वडील मुलायमसिंह यादव यांच्यापेक्षाही मोठा विजय मिळवला आहे. त्याचवेळी बसप आणि भगिनी मायावती यांचीही चर्चा होत आहे. बसपने देशात दुसऱ्या क्रमांकाच्या ४२५ जागा लढवूनही एकही जागा या पक्षाला मिळाली नाही. उत्तर प्रदेशात तर या पक्षाचा मतांचा आलेख थेट निम्म्यावर आला आहे. १९ टक्क्यांवरून मतांची टक्केवारी नऊ टक्क्यांवर आली आहे. गेल्यावेळी उत्तर प्रदेशात लोकसभेच्या दहा जागा मिळाल्या होत्या. समाजवादी पक्षाबरोबर युती करून मायावती यांना फायदा झाला होता. एकेकाळी 'सोशल इंजिनिअरींग' करून उत्तर प्रदेशची सत्ता मिळवलेल्या मायावती त्यांच्या काळातील कथित गैरव्यवहारामुळे इतक्या अडचणीत आल्या, की त्यांनी भाजपला पूरक भूमिका घेतल्याने त्यांना त्यांचा आणि पक्षाचा आत्मघात करून घ्यावा लागला. मायावती यांचा पक्ष दलितांचा पक्ष म्हणून उदयाला आला होता. आता मात्र त्याच दलितांनी मायावती यांची साथ सोडली. मायावती यांच्या पक्षाकडील मतपेढी त्यांच्याच आत्मघातकी निर्णयामुळे समाजवादी पक्ष आणि काँग्रेसकडे सरकली. उत्तर प्रदेशातील दलितांच्या राजकारणात मायावती या मसिहा होत्या. त्यांच्या निर्णयामुळे आता दलित त्यांना नेता मानायला तयार नाहीत. उत्तर प्रदेशात आता दलितांच्या राजकारणात एक पोकळी तयार झाली आहे. त्यांचे राजकीय अवकाश आता चंद्रशेखर यांना मिळायला लागले आहे. स्वतःच्या चुकीमुळे मायावती यांनी आपले राजकीय अवकाश इतरांना उपलब्ध करून दिले आहे.

संसदीय व्यवस्थेत बसप शून्यावर येण्याची ही पहिलीच वेळ आहे. उत्तर प्रदेश विधानसभेत त्यांचे एकमेव आमदार उमाशंकर सिंह आहेत. सिंह हे ही बसपमुळे नव्हे, तर स्वबळावर जिंकतात. सुरुवातीपासूनच बहनजींचे संपूर्ण राजकारण काही वर्षे दबावाखाली सुरू असल्याचे दिसून आले. गेल्या वेळी उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्या कोणत्या ना कोणत्या राजकीय किंवा अन्य प्रकारच्या दबावाखाली असल्याचे दिसून आले होते. भाजपच्या हातातल्या कळसुत्री बाहुल्याप्रमाणे त्या राजकीय गेम खेळतात. त्याचा फायदा शेवटी भाजपला होत असल्याचा निष्कर्षही काढण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या वेळी 'इंडिया'आघाडीच्या लोकांनी पुढे येऊन तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; मात्र बहेनजींनी एकट्याने लढण्याचा निर्णय घेतला. लोकसभा निवडणुकीच्या वेळी जेव्हा त्यांनी तिकीट वाटप सुरू केले, तेव्हा त्या दडपणातून बाहेर पडत असल्याचे दिसत होते; मात्र जेव्हा आकाश आनंद यांच्याकडे जबाबदारी दिली आणि ते धडाक्यात कामाला लागले, तर त्यांच्याविषयीच्या काही तक्रारीवरून मायावती यांनी अचानक आकाश आनंदला समन्वयकपदाच्या जबाबदारीतून मुक्त केले. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर मायावतींच्या प्रचाराची धार संपली आणि त्यांची विश्वासार्हताही संपली. विशेषतः त्यांचा मूळ मतदार असलेल्या समाजात ही विश्वासार्हता नष्ट झाली. कोणत्याही परिस्थितीत मायावती यांच्या पाठीशी उभा राहणारा विचारवंतांचा मोठा वर्गही मायावतीवर टीका करू लागला. त्या विचारवंतांचे त्यांच्या क्षेत्रात वजन आहे. समाजातील लोकांनी त्यांच्या विचारवंतांना अधिक महत्त्व दिले आणि मायावती यांच्यापासून दूर गेले. मायावती यांनी 'सोशल इंजिनीअरींग'च्या माध्यमातून जी ३०-३२ टक्के व्होटबँक निर्माण केली आणि सत्तेत आल्या. त्यात भाजपने सर्वप्रथम मायावती यांची गळचेपी केली आणि गैर-जाटव जातींना स्वतःकडे आकर्षित केले. पासी हा सर्वात मोठा जात समाज आहे, जो भाजपकडे आला आहे. २०२२ च्या निवडणुकीत अखिलेश यादव यांना हे समजले होते. त्यांनी स्वतः पासी समाजावर काम केले. इंद्रजीत सरोज ते अवधेश प्रसाद यांसारख्या नेत्यांना बढती देण्यात आली आणि या वेळी त्यांचे पासी समाजातील चार खासदार विजयी झाले होते. दुसरीकडे, समाजवादी पक्षाबाबत जाटव यांच्या मनात कोणतेही प्रेम नव्हते; परंतु 'इंडिया'आघाडीने त्यांना आश्वस्त केले. ऐतिहासिकदृष्ट्या, त्यांचा काँग्रेसवर विश्वास राहिला आहे. उत्तर प्रदेशातील राखीव जागांपैकी 'इंडिया' आघाडीने सत्तर टक्के जागा जिंकल्या आहेत. मायावतींसाठी हे खेदजनक आहे. तिथे त्यांचे तिसऱ्या क्रमांकावर जाणे किंवा 'इंडिया'आघाडीकडे मतांचे स्थलांतर होणे अत्यंत चिंताजनक आहे. आता मायावतींनी पूर्णपणे नवीन रणनीती आखली, तर कदाचित त्यांचे राजकारणात पुनरागमन शक्य आहे, अन्यथा त्या संपल्यात जमा आहे.

चंद्रशेखर यांच्या रुपाने दलित राजकारणाला नवा चेहरा मिळाला आहे. चंद्रशेखर आझाद आक्रमक आहेत. डॉ.आंबेडकर यांच्यासारखे पूर्वीचे दलित नेते पाहिले, तर त्यांनी संविधानाच्या माध्यमातून दलितांना शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये वाटा मिळवून दिला. कांशीरामांच्या काळात राजकीय सत्ता मिळाली; पण आक्रमकतेचा अभाव होता दलित आणि उच्चवर्णीय यांच्यात संघर्ष झाला, तेव्हा चंद्रशेखर आझाद यांचा उदय झाला. एक म्हणजे त्यांनी थोडी आक्रमकता दाखवली आणि दुसरे म्हणजे त्यांनी अनेक सामाजिक सुधारणेचे प्रकल्प सुरू केले. त्यामुळे साहजिकच त्यांना लोकप्रियता तर मिळाली; पण या विजयाने त्यांचा दर्जाही वाढला आहे आणि राजकीय क्षेत्रात मायावती यांचा दर्जाही घसरला आहे; मात्र चंद्रशेखर यांना अजून खूप मेहनत करावी लागेल. त्यांना पक्षाची संघटनात्मक बांधणी तयार करून पुढे जायचे असेल, तर त्यांना खूप मेहनत करावी लागेल. अखिलेश यांचे मनोबल उंचावलेले आहे. समाजवादी पक्ष देशातील तिसरा सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे आणि नुकत्याच लखनऊमध्ये झालेल्या बैठकीवरून त्यांचा दृष्टिकोन समजण्यासारखा आहे. उत्तर प्रदेशात विधानसभेच्या दहा जागांवर पोटनिवडणूक होत आहे. त्यापैकी पाच जागा समाजवादी पक्षाकडे आणि पाच जागा आणि मित्रपक्षांकडे आहेत. अखिलेश आक्रमक स्थितीत राहतील; पण योगी आदित्यनाथ यांचे सरकार किती सुधारात्मक उपाययोजना करू शकते, यावरही ते अवलंबून असेल. ही पोटनिवडणूक दोन्ही पक्षांसाठी लिटमस टेस्ट आहे. त्यानंतर २०२७ च्या विधानसभा निवडणुका होणार आहेत. तोपर्यंत परिस्थिती खूप बदलली असेल. लोकसभा निवडणुकीत बसप शून्यावर राहिला.

# दौंडच्या भीमा नदीवरचा पूलाचा महाकाय गर्डर खांबासकट कोसळला



**पुणे :** दौंड तालुक्यात काल रात्री नव्याने सुरु असलेल्या भीमा नदीवरील पुलाचे खांब कोसळले आहेत. दौंड आणि नगर जिल्ह्याला जोडणाऱ्या पुलाचे काम चालू होते. या पुलाचे खांब कोसळले आहेत.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी पुलाच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दौंड आणि नगर जिल्ह्याला जोडणाऱ्या दौंड गार गावादरम्यान पुलाचं काम सुरू होतं. २० कोटी रुपये खर्चून हे काम करण्यात येत होतं मात्र पूल उभारण्याचं काम सुरू असताना पुलाचे खांब कोसळले आहेत.

दौंड येथील भीमा नदीवर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत गार आणि दौंड आणि गार या दोन गावांना जोडणारा या पुलाचे काम सुरू असून उन्हाळ्यात भीमा नदी ही पूर्ण कोरडी होती परंतु गेल्या तीन-चार दिवसापासून राज्यात सर्वत्र पाऊस सुरू झाला आहे आणि धरणातून देखील थोडेफार पाणी नदीला सोडण्यात आले आहे. काल रात्री मोठ्या प्रमाणात पाऊस झाला त्यामुळे या कामावरील पिलर चा एक भाग कोसळला त्यामुळे या कामाची पात्रता काय किती निकृष्ट दर्जाचे काम आहे हे यावरून सिद्ध होते. जर काम सुरू असते तर आणि हा असा प्रकार घडला असता तर नक्कीच कोणाला तरी आपला जीव गमवावा लागला असता.

### पुलासाठी २० कोटी रूपये खर्च

**या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. या पुलासाठी २० कोटी रूपये खर्च करण्यात आला आहे. या पुलाचे भूमीपूजन २०२१ साली झाले. या पुलाचे काम निकृष्ठ दर्जाचे असल्याचे समोर येत आहे. तसेच पुलाचं काम करताना सतत अडचणी येत असल्याचं समोर आलं आहे. निकृष्ट कामामुळेच हा पूल कोसळल्याचं स्थानिक म्हणत आहेत. नगर आणि पुण्यात पहिल्या पावसाने हजेरी लावली आहे. त्यानंतर लगेच पूलाचे खांब कोसळल्याची घटना समोर आली आहे.**

### भीमा नदीवरील पुलाच्या कामाची चौकशी होणे गरजेचे

**भीमा नदीवरील पुलाच्या कामाची चौकशी होणे देखील गरजेचे आहे. तसेच दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे. दौंड सार्वजनिक बांधकाम विभागात अधिकारी देखील कोणतीही माहिती देत नाही, असा आरोप देखील होत आहे. त्यामुळे या कामावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.**

# फुटपाथवर आईसोबत झोपलेल्या तान्ह्या बाळाचे अपहरण

## बारा तासात पोलिसांकडून गुन्ह्याची उकल

**ठाणे :** कल्याण शहरात भंगार गोळा करून आपली उपजीविका करणारी आयेशा शेख नेहमीप्रमाणे तिच्या सहा महिन्याच्या चिमुरड्यासह फुटपाथवर झोपली होती. ती गाढ झोपेत असल्याचा फायदा घेऊन, उल्हासनगरमधील रिक्षाचालक दिनेश सरोज, वय ३५ याने आपला मित्र अंकित कुमार प्रजापती याच्या मदतीने तिच्या सहा महिन्याच्या चिमुरड्याचे गोणीत भरून अपहरण केले होते. याप्रकरणी आयेशाने महात्मा फुले पोलीस ठाण्यात आपल्या मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही च्या मदतीने आरोपींना उल्हासनगर मधील त्यांच्या राहत्या घरातून अटक करून अपहरण केलेल्या बाळाची सुखरूप सुटका केली आहे. केवळ बारा तासात गुन्ह्याचा छडा लावून बाळाची सुखरूप सुटका करणाऱ्या पोलिसांचे कौतुक होत आहे.

मूळची नाशिक सिन्नर फाटा येथील झोपडपट्टीत राहणारी आयेशा कल्याण शहरात भंगार गोळा करण्याचे काम करते. भंगार विकून उदरनिर्वाह करणाऱ्या आयेशाला अरबाज नावाचा ६ महिन्याचा मुलगा आहे.

दिवसभर काम करून रस्त्याच्या कडेला आसरा शोधून ती मुलासह रात्रीचा निवारा शोधायची. नेहमीप्रमाणे ती मुलासह कल्याण पश्चिमेकडील व्हर्णाल मेमोरियल मेथडिस्ट चर्चच्या शेजारी असलेल्या कल्याण-डोंबिवली परिवहन डेपोच्या बाजूला असलेल्या फुटपाथवर झोपली होती. शुक्रवारी रात्री १ वाजताच्या सुमारास ती गाढ झोपेत असल्याची संधी साधत उल्हासनगर मधील रिक्षाचालक दिनेश सरोज याने आपल्या साथीदारांसोबत तिच्या चिमुरड्याचे अपहरण केले. दिनेश सरोज या आरोपीने शेजारी राहणाऱ्या टेलरिंग काम करणाऱ्या अंकित कुमार राजेंद्रकुमार प्रजापती याला बरोबर घेऊन आयेशाच्या कुशीत झोपलेल्या सहा महिन्याच्या चिमुरड्याला पोत्यात भरून रिक्षातून पळवून नेले. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. आपल्या कुशीत झोपलेला चिमुरडा अचानक गायब झाल्याचे लक्षात येताच आयेशाने तातडीने महात्मा फुले पोलीस ठाण्यात धाव घेत आपल्या बाळाला शोधण्याची विनंती केली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने या परिसरातील सीसीटीव्ही तपासले असता दिनेशने या चिमुरड्या चे अपहरण केल्याचे समोर आले.

# घाटकोपर होर्डींग दुर्घटनेची निवृत्त न्यायाधीशांमार्फत होणार चौकशी

**मुंबई :** घाटकोपर येथील पेट्रोल पंपावरील होर्डींग दुर्घटनेच्या चौकशीसाठी गृह विभागाने उच्च न्यायाधीश दिलीप भोसलेंच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे.समितीची रचना, कार्य कक्षा गृह विभाग ठरविणार असून समयमर्यादेत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. गृह विभागाने या संदर्भातील शासन आदेश सोमवारी काढले आहे.

घाटकोपर येथील पेट्रोल पंपावर १३ मे रोजी होर्डींग कोसळून दुर्घटना घडली. १६ नागरिकांचा यात बळी गेला. तर ७० हून अधिक जण जखमी झाले. काहींना अपंगत्व आले. बेकायदेशीर होर्डींग प्रकरणी आरोपी भावेष भिंडे याला अटक केली. उच्च न्यायालयाने देखील राज्य सरकार, मुंबई महापालिका, रेल्वे प्रशासनाला झापले. राज्य सरकारने याची दखल घेत, उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश मार्फत चौकशी करण्यासाठी १० जूनला गृह समितीने समिती नेमली आहे. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश दिलीप भोसले हे या समितीचे अध्यक्ष असतील. गृह विभाग या समितीची रचना आणि कार्यकक्षा निश्चित करेल. समय मर्यादेत अहवाल सादर करण्याचे निर्देश गृह विभागाने दिले आहेत. मात्र, नेमका कधीपर्यंत अहवाल सादर करावा, याचा उल्लेख या शासन आदेशात नमूद केलेला नाही. त्यामुळे समितीच्या कार्यपद्धतीवरच संशय व्यक्त केला जातो आहे.

# पुण्यात आभाळमाया ; प्रशासनावर खासदाराचा संताप

**पुणे :** मागील वर्षी रुसलेल्या पावसाची सुरुवात यंदा चांगली झाली आहे. पुणे शहरात गेल्या तीन, चार दिवस जोरदार पाऊस झाला आहे. या पावसाने पुणे शहरातील जून महिन्याची सरासरीही ओलांडली आहे. तसेच वार्षिक सरासरीच्या जवळपास निम्मा पाऊस झाला आहे. गेल्या काही दिवसांत पडलेल्या जोरदार पावसामुळे पावसाळ्याच्या सुरुवातीलाच शहराच्या वार्षिक सरासरीच्या ४१ टक्के पावसाची नोंद झाली आहे. पुणे शहरात या वर्षी आतापर्यंत सुमारे ३१५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

पुणे शहरात शनिवारी मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे शहरच पाण्याखाली गेले होते. शिवाजीनगर येथे ११७ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. १९९१नंतर प्रथमच एका दिवसांत इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस नोंदवला गेला. जूनच्या सरासरीच्या जवळपास ६४ टक्के पाऊस एकाच दिवसात पडला होता.पुणे शहरात शनिवारी सायंकाळी झालेल्या जोरदार पावसाने महापालिकेच्या कामाची पोलखोल झाली. शहराच्या अनेक भागांत पाणी तुंबण्याच्या घटना घडल्या. या प्रकाराचे खापर खासदार मेधा कुलकर्णी यांनी महापालिका प्रशासनावर फोडले आहे. त्याबाबतचे निवेदन त्यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांना दिले आहे.पुणे शहरातील अनधिकृत बांधकामांकडे केलेले दुर्लक्ष आणि महापालिकेने नैसर्गिक नाले बुजविण्याच्या केलेल्या पापामुळेच शनिवारच्या पावसात शहर पाण्याखाली गेले आहे, असा आरोप भाजपच्या खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केला आहे.तीन दिवसांच्या पावसानंतर देखील खडकवासला धरण साखळी क्षेत्राच्या पाणीसाठ्यात वाढ झालेली नाही. खडकवासला धरण साखळी क्षेत्रात केवळ ४.२१ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. खडकवासला धरण साखळी क्षेत्राचा पाणीसाठा वाढवण्यासाठी १२० मिलिमीटर पावसाची गरज आहे.

राज्यभर झालेल्या पावसामुळे पुण्यात भाज्यांची आवक घटली आहे. पुण्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भाज्यांची आवक कमी तर मागणी जास्त आहे. त्यामुळे अनेक भाज्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. कांदा, हिरवी मिरची, शिमला मिरची, काकडी, शेवगा या भाज्यांच्या दरात पाच ते दहा टक्क्यांनी झाली आहे. परंतु पुण्यातील बाजारात टोमॅटोचे भाव उतरले आहेत. फुलांना देखील पावसाचा मोठा फटका बसला आहे. आवक घटल्याने फुलांचे देखील भाव वधारले आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात तुफान पाऊस झाला आहे. सलग पाच दिवस पडणाऱ्या पावसामुळे सीना - भोगावती नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. दुष्काळग्रस्त भागात पावसाने जोरदार बॅटींग केल्यामुळे शेतकरी राजा आनंदात आहे. मोहोळ तालुक्यातील मालिकपेठ, एकुरके, भोयरे, हिंगणी, बोपले भागातील शेतात साचले पाणी तर कांही ठिकाणी बंधारे फुटून पाणी वाहू लागले आहे.

### मोदी सरकारच्या पहिल्याच दिवशी

# शेतकरी सन्मान निधीचा सतरावा हप्ता जारी

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. रविवारी राष्ट्रपती भवनात झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा शपथ घेताना पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या विक्रमाची बरोबरी केली. मोदी ३.० सरकारच्या पहिल्याच दिवशी पहिला निर्णय शेतकऱ्यांसाठी घेतला. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा १७ वा हप्ता सोमवारी जारी करण्यात आला आहे. दोन हजार रुपयांचा हा हप्ता देशभरातील कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला आहे.

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरिता नरेंद्र मोदी २ सरकारने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेत शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये मदत दिली जाते.

दर चार महिन्यांनी दोन, दोन हजार रुपये दिले जातात. तसेच केंद्राच्या धर्तीवर राज्य सरकारने ही योजना सुरु केली आहे.

राज्य सरकारकडूनही सहा हजार रुपये दिले जातात. यामुळे केंद्र आणि राज्य सरकार मिळून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या खात्यात वर्षाला बारा हजार रुपये जमा होतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा सूत्र स्वीकारल्यानंतर पहिला निर्णय शेतकऱ्यांसाठी घेतला आहे. त्यांनी शेतकरी सन्मान निधीचा हप्ता जारी केला आहे. त्याचा फायदा देशभरातील ९.३ कोटी शेतकऱ्यांना होणार आहे. यावेळी बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले की, आम्ही शेतकऱ्यांच्या विकास आणि कल्याणासाठी कटीबद्ध आहोत. कृषी क्षेत्रासाठी सातत्याने काम करत राहणार आहोत.



**असा चेक करा तुमचा हप्ता**

**यापूर्वी पीएम शेतकरी सन्मान योजनेचा १६ हप्ता २८ फेब्रुवारी रोजी आला होता. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी बँक खाती आधार संलग्न करून घेणे गरजेचे आहे. तसेच बँकेत केवायसी पूर्ण करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना https://pmkisan.gov.in वर जाऊन आपल्या खात्यात शेतकरी सन्मान योजनेचा १७ वा हप्ता जारी झाला की नाही? हे तपासून घेऊन शकतात. तसेच यासंदर्भात काही अडचण असल्यास हेल्पलाइन (१८००-११५-५५२५) वर संपर्क करु शकतात.**

# शिर्डीच्या औद्योगिक वसाहतीची प्रस्तावित कामे तातडीने करण्याचे महसूल मंत्र्यांचे आदेश

**मुंबई :** शिर्डीच्या औद्योगिक वसाहतीची प्रस्तावित कामे तातडीने करण्याचे आदेश राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. मुंबईत शासकीय निवासस्थानी या वसाहतीच्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी शिर्डीतील औद्योगिक वसाहतीच्या कामाचा विविध विभागाकडून सखोल आढावा घेतला.

शेती महामंडळाच्या वतीने ५०० एकर जमीन औद्योगिक महामंडळाला विनाशुल्क देण्यात आली आहे. यामुळे या जागे संदर्भातील सर्व सोपस्कार महामंडळाने तातडीने पार पाडून उद्योजकांना तातडीने जमीन वाटप करण्यात करता यावी यासाठी आवश्यक असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश मंत्री महोदयांनी दिले. सदर बैठकीला उद्योग मंत्रालयाचे विशेष कार्य अधिकारी संतोष भिसे, मुंबईचे भूमी व्यवस्थापक बप्पा थोरात, पुणे एमआयडीसीचे उपमुख्य कार्यकारी अभियंता, उपवनसंरक्षक अधिकारी नगर, गोदावरी प्रकल्प कार्यकारी अभियंता,कार्यकारी अभियंता महावितरण तथा इतर विभागीय अधिकारी उपस्थित होते.

# अजित पवार यांना डिवचणारे बारामतीमध्ये बॅनर्स : नवीन दादा कोण?

**बारामती :** लोकसभा निवडणुकीत अजित पवार गटाचा पराभव झाला. शरद पवार यांनी पुन्हा बाजी मारली. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा शरद पवार यांची कन्या सुप्रिया सुळे यांनी दणदणीत पराभव केला. अगदी बारामती विधानसभा मतदार संघातही सुप्रिया सुळे यांना जास्त मते मिळाली. यामुळे बारामतीमध्ये अजित पवार यांची विधानसभेत कस लागणार आहे. त्याचवेळी शरद पवार गटाकडूनही विधानसभेची तयारी सुरु केली आहे. अजित दादांऐवजी नवीन दादा तयार केला गेला आहे. अजित पवार यांना डिवचणारे बॅनर्स त्यासाठी बारामतीमधील सुपामध्ये लावण्यात आले आहे. 'वादा तोच दादा नवा', असे बॅनर्स लावले आहे. त्यात बारामतीचा नवीन दादा युगेंद्र पवार यांना म्हटले गेले आहे. यामुळे विधानसभेत पुन्हा पवार गटात लढाई जुंपणार आहे. अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार अशी लढत होणार आहे. युगेंद्र पवार अजित पवार यांचे मोठे बंधू श्रीनिवास पवार यांचे चिरंजीव आहे.



सुप्रिया सुळे यांच्या विजयाचे बारामतीमधील सुपा येथे बॅनरबाजी करण्यात आली आहे. त्या बॅनर्सवर 'वादा तोच दादा नवा' असे लिहिले असून युगेंद्र पवार यांच्या फोटो लावला आहे. तसेच हर वाल का पलटवार हुं मै, युही नही कहलाता शरद पवार हुं मै असे वाक्य लिहून सुप्रिया सुळे यांना चौथ्यांदा विजयाबद्दल अभिनंदन केले आहे. या बॅनर्सची चर्चा सर्वत्र रंगली आहे. युगेंद्र पवार बारामतीमधून विधानसभा निवडणूक लढविणार आहे, आशी चर्चा सुरू आहे. त्यासाठी त्यांच्या नावाची चर्चा आतापासून सुरु आहे. त्यातच आता बॅनर लावल्याने चर्चांना उधाण आले. बॅनरवर लिहिलेल्या मजकुरावरून अजित पवार यांना डिवचले आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हे बॅनर लावले आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहुपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

## क्राईम

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

**सातारा :** सातारा तालुक्यातील एका गावातून अज्ञाताने अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा तालुक्यातील एका गावातून १५ वर्षीय मुलीचे अज्ञाताने अपहरण केले. ही घटना दि. ६ जून रोजी घडली असून सातारा तालुका पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

### अपघातातील एकाचा मृत्यू

**सातारा :** रस्ता अपघातातील एकाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, रस्ता अपघातात प्रमोद बाळकृष्ण बोभाटे (वय ३२, रा. मुळीकवाडी ता.सातारा) हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात झाली आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**सातारा :** अज्ञात वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पायी रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात चारचाकी वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात सौ. साखराबाई यशवंत अडागळे (वय ६०, रा. खावली ता.सातारा) यांचा मृत्यू झाला. ही घटना दि. २ जून रोजी घडली असून सातारा शहर पोलीस ठाण्यात याची नोंद झाली आहे.

### एकास मारहाण केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** एकास मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, नगर वाचनालय, सातारा येथे तिघांनी मारहाण केल्याप्रकरणी शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. रवी भोसले, महेश रसाळ, उमेश रसाळ (रा. शुक्रवार पेठ, सातारा) यांच्या विरुध्द अलोक रविंद्र गायकवाड (वय ३६, रा. शुक्रवार पेठ, सातारा) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. दि. ५ जून रोजी ही घटना घडली असून संशयितांनी लाकडी दांडक्याने मारहाण करुन शिवीगाळ केली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### आदेशाचा भंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सातारा : आदेशाचा भंग केल्याप्रकरणी एकाविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, तडीपारीचे आदेश असताना त्या आदेशाचा भंग करुन सातार्यात फिरणार्या विकास उर्फ यल्ल्या शर्णाप्पा कुर्मणी (वय २३, रा. बॉम्बे रेस्टॉरंट परिसर, सातारा) याला स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने पकडले. त्याच्या विरुध्द सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुचाकीची चोरी

सातारा : जिल्हा परिषदेच्या मैदानावरील पार्कींगमधून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, जिल्हा परिषदेच्या मैदानावरील पार्कींगमधून अज्ञात चोरट्याने एमएच ११ सीएल ३९९७ या क्रमांकाची दुचाकी चोरुन नेली. ही घटना दि. ७ जून रोजी घडली असून याप्रकरणी प्रसाद सुनील माने (वय २७, रा. विलासपूर, सातारा) यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

### नोकरीच्या आमिषाने फसवणूक केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा :** नोकरीला लावतो, असे सांगून ऑनलाईन पैसे घेवून फसवणूक केल्याप्रकरणी जावेद मुबारक पठाण (रा.केळघर ता.जावली) याच्या विरुध्द सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, फतिमा अनिज हेळवाकर (रा.कृष्णानगर, सातारा) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना ११ मे रोजी घडली आहे. तक्रारदार यांना नोकरी लावतो असे सांगून संशयियताने कागदपत्रे ऑनलाईन भरण्यासाठी पैसे घेतले. मात्र पैसे भरुनही नोकरी लागत नसल्याने त्याबाबत तक्रारदार यांनी पाठपुरावा केला असता फसवणूक झाल्याचे समोर आले. तसेच तक्रारदार यांच्या प्रमाणेच आरती कोपर्डे, प्रमोद वायसळ, तौसिफ शेख, रतनबी शेख यांची फसवणूक झाली आहे. दरम्यान, आतापर्यंत ९०७०० रुपयांची फसवणूक झाली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### कोरेगावमधील घरफोडीच्या गुन्ह्याची उकल

एकजण ताब्यात; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**कोरेगाव :** कोरेगाव येथे घरफोडी केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने (एलसीबी) एकाला अटक करुन चोरीचा मुद्देमाल जप्त केला. दरम्यान, यामध्ये आणखी एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

अशोक शिंदे (वय १९, रा.कोरेगाव) असे अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ८ जून रोजी एकजण सातारा शहरातील करंजे नाका येथे घरफोडी चोरीतील सोन्याचे दागिने विक्री करण्याकरीता येणार असल्याची माहिती एलसीबी पथकाला मिळाली. करंजेनाका ते म्हसवे रोड याठिकाणी पोलिसांनी सापळा लावून संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्याकडे पाहणी केली असता अंगझडतीमध्ये ५३००० रुपये किंमतीची एक सोन्याची चेन, चांदीची चेन, पायातील चांदीचे पैजन मिळून आले.

पोलिसांनी संशयिताकडे दागिन्यांबाबत चौकशी केली असता तो निरुत्तर झाला. पोलिसांनी त्याला बोलते केले असता कोरेगाव शहरातील श्रीनाथनगर मार्केट यार्डचे पाठीमागे असलेल्या एका घरात साथीदारासोबत चोरी केल्याची कबुली दिली. एलसीबी पोलिसांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात माहिती घेतली असता गुन्हा दाखल असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार पोलिसांनी दागिने जप्त करुन संशयिताला अटक केली. तसेच दुसरा अल्पवयीन मुलगा असल्याने त्याला ताब्यात घेतले.

पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक आँचल दलाल, पोनि अरुण देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुधीर पाटील, पृथ्वीराज ताटे, रोहित फाणें, फौजदार विश्वास शिंगाडे, अमित पाटील, पोलीस विजय कांबळे, शरद बेबले, लैलेश फडतरे, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, अविनाश चव्हाण, गणेश कापरे, विशाल पवार, सचिन ससाणे, मयुर देशमुख यांनी कामगिरी केली.

# सुशांत मोरे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषण

## झाडाणी प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी




**सातारा :** झाडाणी तालुका महाबळेश्वर येथील अनधिकृत बांधकाम पाडणे व जमीन खरेदी गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय देणे यासह सह्याद्री व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील जंगलतोड खाणकाम खोदकाम रोखणे या मागण्यांसाठी साताऱ्याचे सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय उपोषण सुरू केले आहे . याप्रकरणी न्याय मिळेपर्यंत विविध माध्यमातून आंदोलन सुरूच राहणार असल्याचे मोरे यांनी स्पष्ट केले आहे

झाडाणी प्रकरणांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी सुशांत मोरे यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन जीएसटी आयुक्त चंद्रकांत वळवी यांच्यासह दोघांना चौकशीची नोटीस बजावली आहे .तरीसुद्धा या प्रकरणातील शासकीय अधिकारी यांचा समावेश स्पष्ट व्हावा आणि शेतकऱ्यांना या प्रकरणात न्याय मिळावा याकरिता सुशांत मोरे यांनी दिलेला इशाऱ्याप्रमाणे पुन्हा आंदोलन सुरू केले आहे . सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रातील वेळे, कोरणे ,पाथरपुंज, खीरखिंडी गोठणे, आदी गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावणे, बफरक्षेत्रातील गावांना अठरा प्रकारच्या नागरिक सुविधा उपलब्ध करून देणे, व्याघ्र प्रकल्पातील बफर क्षेत्रातील जमीन खरेदी विक्री व्यवहाराची चौकशी करणे, कांदाटी खोऱ्यातील सोळा गावांना रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देणे, नवजा तालुका पाटण येथील ओझर्डे धबधब्याचे व्यवस्थापन स्थानिक व समितीकडे सोपवणे, सह्याद्री व्याघ्र कोअर व राखीव क्षेत्रातील लोकांवर होणारे हिस्त्र प्राण्यांच्या हल्ल्यांबद्दल तत्काळ मदत करणे व वासोटा किल्ला परिसरात प्लास्टिक संकलन केंद्राची उभारणी करणे अशा विविध मागण्या घेऊन प्रशांत मोरे उपोषणाला बसले आहेत

याबाबतचे निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना सादर केले आहे याप्रकरणी तात्काळ मागण्या मान्य करण्यात याव्यात तसेच हा विषय मार्गी लागेपर्यंत वेगवेगळ्या माध्यमातून आंदोलन सुरू राहणार असल्याचे मोरे यांनी सांगितले आहे

# मातब्बर घराण्यांना डावलण्याचा भाजपचा माढ्यामध्ये फटका

**सातारा :** नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत माढा मतदारसंघात भाजपाचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी १ लाख २० हजार ८३७ मतांनी पराभव केला. या पराभवाची अनेक कारणे असली तरी विद्यमान खासदारांच्या बद्दलची पहिल्यापासूनची निगेटीव्हीटी कायम राहण्याबरोबरच मतदारसंघातील अकलूजचे मोहिते-पाटील आणि फलटणचे नाईक-निंबाळकर या दोन मातब्बर घराण्यांना भाजपकडून डावलण्याचा परिणाम असल्याची चर्चा राजकीय जाणकारांमध्ये आहे.

माढा मतदारसंघातून भाजपाकडून निवडणूक लढविण्यासाठी सुरुवातीला खा. रणजित निंबाळकर यांच्यासह धैर्यशिल मोहिते-पाटील, अजितदादा पवार गटाकडून संजीवराजे नाईक-निंबाळकर यांची नांवे चर्चेत होती. मात्र अजितदादांनी माढा मतदारसंघ स्वत:च्या पक्षाला मागीतला नसल्याने संजीवराजेंचा पत्ता कट झाला. भाजपच्या यंत्रणेकडून निवडणूक पूर्व सर्व्हे केला होता. त्यामध्ये खा. नाईक निंबाळकर यांच्यासंदर्भात निगेटीव्हीटी होती. तरीही माणचे आ. जयकुमार गोरे यांनी आपले संपूर्ण कौशल्य वापरत उमेदवारीचे घोडे दामटले. त्यांच्या व श्रेष्ठींच्या अंदाजानुसार मोहिते-पाटलांना विरोध म्हणून आ. बबनदादा शिंदे, आ. संजयमामा शिंदे, आ. शहाजीबापू पाटील हे पक्षाचे काम प्रामाणिक करतील तसेच फलटणचे रामराजे नाईक निंबाळकर, संजीवराजे नाईक निंबाळकर हे अजितदादा गटात असल्या कारणाने फारशी वळवळ करणार नाहीत. तर अडचणीच्या काळात कारखानदारी वाचविण्यासाठी मोहिते-पाटलांना सरकारकडून कोट्यावधी रुपयांची मदत मिळाली आहे. या मदतीच्या बोजाखाली दबून अकलूजकर सुतासारखे सरळ वागतील अशी सत्ताधार्यांची अटकळ होती. सुरुवातीला तर उमेदवार नसल्या कारणाने राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार साहेबांनी रा.स.प. चे महादेव जानकर यांच्याशीही चर्चा केली होती. त्याचबरोबर माण तालुक्यातील युवा नेते अभयदादा जगताप यांनाही अनेक ठिकाणी वेगवेगळे कार्यक्रम घेवून चर्चेत ठेवले होते.

मात्र घडले भलतेच भाजपाने अर्ज भरण्याच्या खुपच अगोदर पहिल्या, दुसर्या यादीतच विद्यमान खासदार रणजित निंबाळकरांची उमेदवारी घोषित केली. त्यानंतर त्यांच्या विरोधात उमेदवार कोण याबाबत पंधरा दिवस मोठा खल झाला. त्यामध्ये शेवटच्या क्षणी धैर्यशिल मोहिते-पाटलांनी उमेदवारीसाठी धाडस केले. सरळ लढत झाल्यानंतर मोहिते-पाटलांना फक्त माळशिरसमध्ये मोठे मताधिक्य मिळेल व ते फलटण तसेच माण-खटाव या दोन विधानसभा मतदारसंघातच तोडण्याची व्युवरचना करण्यात आली.

अपेक्षेप्रमाणे माळशिरसमध्ये मोहिते-पाटील यांना १ लाख ३४ हजार २७९ तर रणजित निंबाळकर यांना ६४ हजार १४५ मते मिळाली. त्या तुलनेत होमग्राऊंड म्हणून फलटणकरांनी रणजितदादांना म्हणावी, तशी साथ दिली नाही. या ठिकाणी त्यांना १ लाख १० हजार ५६१ तर मोहिते-पाटील यांना ९३ हजार ६३३ मते मिळाली. माढा, करमाळा व सांगोला तालुक्याकडून भाजपाला मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र यापैकी सांगोला तालुक्याने नाममात्र साडेचार हजार मतांची आघाडी दिली. या ठिकाणी नाईक निंबाळकरांना ८९ हजार ०३८ तर मोहिते पाटलांना ८४ हजार ५५६ मते मिळाली. तर करमाळ्यात आ. संजयमामा शिंदे तसेच माजी आ. जयवंत जगताप, युवा नेत्या रश्मी बागल या तिघांचे गट एकत्र असल्याने मोठे मताधिक्य भाजपला मिळेल असा अंदाज होता. मात्र संजयमामांचे समर्थक अद्याप मागच्या वेळचा पराभव विसरले नसल्याने या ठिकाणी मोहिते-पाटलांना सुमारे ४० हजारांचे मताधिक्य मिळाले. या ठिकाणी मोहिते-पाटील यांना ९७ हजार ४६९ तर नाईक निंबाळकर यांना ५५ हजार ९५८ मते मिळाली.

माढ्यात बबनदादा आजारी असल्या कारणाने त्यांचे सुपुत्र रणजितभैय्या शिंदे प्रचाराची धुरा हाकत होते. त्याचबरोबर विधानपरिषदेचे आमदार प्रशांत परिचारक तसेच चंद्रभागा कारखान्याचे कल्याणराव काळे हे ही नाईक निंबाळकरांच्या प्रचारात आघाडीवर होते. तर राष्ट्रवादीच्या गोटातील विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांनाही सत्ताधार्यांनी हुक लावत पाठींबा देण्यास राजी केले होते. त्यामुळे या ठिकाणीही मोठी आघाडी मिळण्याची अपेक्षा होती. मात्र घडले उलटेच. या ठिकाणीही तुतारीलाच जवळजवळ ५० हजारापेक्षा जास्त मतांचे मताधिक्य मिळाले. या ठिकाणी मोहिते-पाटील यांना १ लाख २२ हजार ५७० तर नाईक निंबाळकर यांना ७० हजार ०५५ मते मिळाली.

### माणचा गड राखला

**मराठा आरक्षण, नोकरदारांची जुनी पेन्शन योजना मागणी, कांदा दर तसेच निर्यातबंदी, शेती-पाणी प्रश्न असे अडचणीचे मुद्दे असतानासुध्दा माण-खटाव मतदारसंघात भाजपाला १ लाख ९४ हजार १४ तर मोहिते-पाटील यांचा ८६ हजार ०५९ मते मिळाली. या निमित्ताने आ. जयकुमार गोरे यांनी आपला गड कायम राखला आहे. या निमित्ताने त्यांनी आपली प्रतिष्ठा जपली आहे. तर विरोधकांच्या दृष्टीने ही अस्तीत्वाची लढत होती. त्यामुळे आ. गोरे यांच्या विरोधातील निवृत्त आयुक्त प्रभाकर देशमुख, शिवसेनेचे शेखरभाऊ गोरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिलभाऊ देसाई, राष्ट्रीय काँग्रेसचे नेते रणजितसिंह देशमुख तसेच राष्ट्रवादीचे युवा नेतृत्व अभयदादा जगताप या मंडळींना मोहिते-पाटलांच्या विजयाने काहीअंशी दिलासा मिळाला आहे. पण विधानसभा निवडणुकीपर्यंत एकी ठेवण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे.**

# तहसीलदार मॅडम संजय गांधी निराधार योजनेतील प्रकरणावर सह्या कराल का?

## मनसेचे सूरज लोहार यांचा सवाल : पत्रकारांसमोरच मांडली व्यथा

**वडूज :** गेल्या अनेक महिन्यापासून संजय गांधी निराधार योजनेतील प्रकारणावर खटाव तहसीलदार यांनी सह्या केल्या नसल्याने अनेक सर्वसामान्य लभार्थी या योजनेपासून वंचित राहिले आहेत. किमान महिला तहसीलदार असताना ही त्यांना विधवा महिलांची, अपंग, निराधार, घटस्फोटीत इ महिलांची तळमळ पाहिजे होती मात्र प्रत्यक्षात या सर्व योजनेची कामे सही नसल्याने प्रलंबित आहेत. तहसीलदार मॅडम संजय गांधी निराधार योजनेतील प्रकरणावर सह्या कराल का? असा सवाल मनसेचे राज्य चिटणीस सूरज लोहार यांनी पत्रकारांसमोर केला.

आज वडूज येथील मनसे कार्यलयात पत्रकारांशी ते बोलत होते. यावेळी विशाल गोडसे, सचिन खुडे, पवन नागावकर, मन्सूर खोत, आदित्य लोहार, मंगेश लोहार, विशाल लोहार, तुषार लोहार, अमित पंडित, ऋषिकेश लोहार, महेश देसाई आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री लोहार पुढे म्हणाले गेल्या चार महिन्यापासून खटाव तहसील कार्यालयात दाखल असणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेची अनेक प्रकरणे तहसीलदार यांची सही नसल्या कारणाने प्रलंबित आहेत. तालुक्यातील ग्रामीण भागातून येणाऱ्या सर्वसामान्य जनतेला हेलपाटे मारण्याची वेळ आली आहे. अनेक वेळा संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी टोलवा टोलवी ची उत्तरे देत आहेत. खटाव तहसील कार्यालयात ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची वर्दळ जास्त आहे. मात्र याठिकाणी असणाऱ्या कर्मचारी वर्गाकडून लोकांना टोलवाटोलवी केली जातं असल्याचा आरोप ही त्यांनी केला. याबाबत लवकरात लवकर सर्वसामान्य जनतेची संजय गांधी निराधार योजनेत असणारी प्रकरणे मार्गी लावावीत अन्यथा मनसे च्या वतीने तीव्र आंदोलन करणार असल्याचा तीव्र इशारा यावेळी दिला आहे.

### प्रतापसिंह नगरात विद्येचे फुलू लागले अंकुर

**सातारा :** सातारा शहरा नजीक असलेल्या खेड हद्दीतील प्रतापसिंह नगर म्हणजे राडा. असेच समीकरण झाले होते. परंतु, आता नवं पिढीने शिक्षणाचे मोल जाणले आहे. त्यामुळे आता प्रताप सिंह नगरात विद्येचे अंकुर फुलत आहेत. त्याचे आता सर्वत्र कौतुक होत आहे

याबाबत माहिती अशी की, महाराष्ट्रात १९७२ साली मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला. पाऊस नसल्यामुळे अन्नधान्य पिकू शकले नाही. त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी अनेकांना विस्थापित व्हावे लागले.

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या सातारा भूमी म्हणजे मायेने आपलेसे करणारी भूमी होती. त्यामुळे गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, केरळ ,आंध्र प्रदेश, तामिळनाडू ,पश्चिम बंगाल अशा विविध राज्यातून अनेक लोक साताऱ्यात आले. इथल्या संस्कृती सोबत त्यांनी नाळ जोडली. त्याच पद्धतीने १९७२ च्या दुष्काळानंतर उस्मानाबाद ,सोलापूर ,बीड, नगर, लातूर मराठवाड्या विभागातून आलेल्या अनेकांना साताऱ्याने हजेरी माळावर आसरा दिला.

प्रारंभी कचरा वेचक,मजुरी, गवंडी, सुतार काम सेंटरिंग व हमालीचे काम करत असताना आपल्या पुढच्या पिढीला हे काम करणे शक्य होणार नाही. त्यांनी शिक्षण घेतले पाहिजे.

# जिथे येळगावकर तिथे पराभव निश्चित : सुरेंद्र गुदगे

**मायणी :** कोणत्याही निवडणूकीत जिथे येळगांवकर असतील तिथला उमेदवार पराभूत होतोच होतो अशी घणाघाती टिका माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेंद्र गुदगे यांनी पत्रकार परिषदेत केली.

मायणी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते गत विधानसभा निवडणूकीत डॉ. येळगावकर यांनी प्रभाकर देशमुख यांचे काम केले होते त्याही वेळेस प्रभाकर देशमुख यांचा निसटता पराभव झाला होता आता ही लोकसभा निवडणूकीत डॉ. येळगावकरांनी रणजितसिंह निंबाळकरांचे काम केले आणि त्यांचा पराभव झाला त्यामुळे येळगावकर व हार हे समिकरण बनले आहे. त्यामुळे नेत्यांनी यांचेपासून सुरक्षित अंतर ठेवूनच रहावे. अन्यथा अपघात अटळ आहे अशी जोरदार टीका केली.

खटाव माण मतदार संघामध्ये भाजप उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांना मताधिक्य मिळाले खटाव तालुक्यात सहा हजार व विशेषत: मायणी गटामध्ये दोन हजार मताधिक्य मिळाले म्हणून येळगावकर उर बडवून घेत आहेत. परंतु सर्वांना माहिती आहे हे मताधिक्य लक्ष्मीदर्शनाने मिळाले आहे. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना कसलीच रसद नसताना भाजपचा वारू रोखला .

माळशिरसचे लिड खटाव-माणमध्ये तोडणार व सर्व विधानसभा मतदार संघातील आमदार आमचे सोबत असल्यामुळे मोठे मताधिक्य घेणार अशा वल्गना फेल ठरल्या आहेत. उलट खटाव -माण फलटणमध्ये लक्ष्मी दर्शनाने मोहिते पाटलांचे होणारे 'डॅमेज कंट्रोल' करण्यात आघाडीचे कार्यकर्ते यशस्वी झाले आहेत.

त्यामुळे सव्वा लाखांच्या फरकाने धैर्यशिल मोहिते-पटील निवडूण आले आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाला उमेदवारच नाही अशी परिस्थिती निवडणूकीपूर्वी असताना खटाव माण फलटणच्या आघाडीच्या कार्यकत्यांनी उमेदवार देण्यात व निवडूण आणण्यात महत्वाची भूमीका बजावली. त्यामुळे येळगांवकरांनी उगाच उर बडवून घेवू नये.

डॉ येळगावकर मायणी गटात दोन हजाराचे लीड घेतल्याचे मोठ्या अभिमानाने सांगत आहेत. परंतु स्वतच्या गावात (मायणीत) किती लीड आहे हे ही येळगावकरांनी सांगावे.?

### शाहूनगरमध्ये स्वातंत्र्य सैनिकाच्या पत्नीला लुबाडले

**सातारा :** शाहूनगर येथील पॅरेंट्स स्कूल परिसरात फिरायला गेलेल्या स्वातंत्र्य सैनिकाच्या वृद्ध पत्नीस पोलीस असल्याचे सांगून दोघा अज्ञातांनी लुबाडले. चोरट्यांनी तीन तोळ्यांच्या पाटल्या घेऊन पोबारा केला. रविवारी सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास ही घटना घडली. जानकी रामचंद्र घार्गे (वय ८१, मूळ रा. जयराम स्वामी वडगाव, सध्या रा. प्लॉट नं. ४५, सुमित्राराजे हौसिंग सोसायटी, शाहूनगर) यांनी फिर्याद दिली.

रविवारी सायंकाळी घार्गे या फिरायला गेल्या असताना रस्त्यावर असलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्याशी संवाद साधत या भागात चोर्या होतात आम्हाला पोलिसांनी येथे देखरेखीसाठी या भागात पाठवले आहे, असे सांगितले. तुम्ही तुमच्या हातातील पाटल्या काढून ठेवा, असे सांगत हातचलाखीने प्रत्येकी दीड तोळ्याची एक अशा तीन तोळ्यांच्या दोन सोन्याच्या पाटल्या काढून त्याऐवजी स्टीलचे कडे वर्तमानपत्रात गुंडाळून घार्गे यांच्याकडे देत पोबारा केला.



# खटावमधील बंधारे तुडुंब

## दुष्काळाच्या छायेतून अनेक गावांना मुक्तता

**खटाव :** अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर खटाव व परिसरातील अनेक गावांत मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. खरीप हंगामातील पेरणीपूर्व मशागतीसाठी हा पाऊस उपयुक्त असल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. कडक उन्हाळा अनुभवणाऱ्या या तालुक्यात अचानकपणे पर्जन्यवृष्टीने पाणीच पाणी झाले. ओढे, नदीवर असलेले छोटे-मोठे बंधारे तब्बल दोन वर्षांनी तुडुंब भरले. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागणार असल्याने दिलासा मिळाला आहे.

सकाळपासून परिसरातील अनेक गावांत मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. रात्रीपर्यंत पाऊस सुरू राहिल्याने गारवा निर्माण झाला होता.

गेले अनेक दिवस कमाल तापमानाने उच्चांक गाठला होता. तापमानात वाढ होऊन अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या होत्या. सकाळपासून ढगाळ वातावरण व हवेत प्रचंड उष्णता होती. मात्र पावसाने हुलकावणी दिली.

शनिवारी १० ते ११ च्या दरम्यान पावसाला सुरुवात होऊन अनेक गावांत विजांच्या कडकडाटासह दमदार सरी कोसळल्या. जवळपास दीड तास मुसळधार पाऊस झाला. रात्री उशिरापर्यंत पाऊस पडत असल्याने ओढे, नाले व त्यावरील बंधारे भरून वाहिले.

सलग दोन वर्षे दुष्काळी परिस्थिती असल्याने लोणी, भोसरे, अंधेरी, जायगाव, कोकराळे, जांब आदी गावांना पाणीटंचाईच्या प्रचंड झळा बसल्या होत्या. खटाव येथील दुष्काळी पट्ट्यात पडलेल्या दमदार पावसाने तेथील ओढ्यावरील बंधाऱ्यांचा अनेक गावांना लाभ होणार आहे.

# संभाव्य महापुराच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सज्ज

**शिरोळ :** ११ यांत्रिकी बोटी, १०० लाईफ जॅकेट, १०० लाइफ रिंग, १० ओबीएम मशीन, १८ लाकडी नौका, फ्लोटिंग पंप, फ्लोटिंग रोप, तालुक्यातील विविध ठिकाणी उभारण्यात आलेले निवारा शेड आणि आपत्ती काळात बचाव कार्यासाठी सज्ज असलेले ४०० जवान हे संभाव्य महापुराच्या पार्श्वभूमीवर सज्ज झाले आहेत. जिल्हाधिकारी अमोल येडगे, प्रांताधिकारी मौसमी चौगुले - बर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरोळचे तहसीलदार अनिलकुमार हेळकर यांची टीम शिरोळ तालुक्यात युद्ध पातळीवर काम करीत आहे. हवामान खात्याने यावर्षी प्रमाणापेक्षा ज्यादा पावसाचा अंदाज दिल्याने प्रशासन त्या दृष्टीने कामाला लागल्याचे चित्र शिरोळ तालुक्यात दिसून येत आहे.



**शिरोळ तालुक्यात संभाव्य महापुराच्या पार्श्वभूमीवर पाहणी करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे प्रांताधिकारी मोसमी चौगुले, तहसीलदार अनिलकुमार हेळकर व प्रशासनाचे अधिकारी.**

संभाव्य महापुराच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन शिरोळ यांच्या वतीने आतापासूनच महापूराचे नियोजन करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे त्याचाच एक भाग म्हणून गुगल फार्मच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी ऑनलाइन फॉर्म भरून घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. याचबरोबर महापुराच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण जिल्ह्यात ६५० भोंगे लावण्यात आले असून या भोंग्याच्या माध्यमातून पूर परिस्थितीची माहिती लोकांच्या पर्यंत पोहोचणार आहे. याच पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन सध्या युद्धपातळीवर तयारी करत असल्याचे समजते. दरम्यान संभाव्य महापुराच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अमोल येडगे, प्रांताधिकारी मोसमी चौगुले बर्डे, तहसीलदार अनिलकुमार हेळकर यांच्यासह तालुक्यातील प्रशासनाच्या वतीने विविध ठिकाणी भेटी घेऊन नुकतीच पाहणी करण्यात आली आहे.

सन २०१९ व २१ साली आलेल्या महापुरात शेती पिकांसह घरे, दुकाने, जनावरांचे गोठे, कुकुटपालन शेड, ग्रीन हाऊससह महावितरणचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याचबरोबर हजारो नागरिकांचे स्थलांतर इतर ठिकाणी करण्यात आले होते. आपत्ती व्यवस्थापन, एनडीआरएफ पथक, रेस्क्यू फोर्स यांच्या वतीने नागरिकांना स्थलांतर करण्याचे काम करण्यात आले होते. शिरोळ तालुक्यातील अनेक गावांना बेटाचे स्वरूप प्राप्त झाले होते. अनेक गावे पाण्याखाली गेली होती. त्यामुळे शिरोळ तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला होता. त्यामुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीला मोठ्या आव्हानाला सामोरे जावे लागले होते.

दरम्यान, महापुराच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनच्या वतीने महापुरा संदर्भात माहिती समाजातील शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचावी याकरिता गुगल फॉर्म च्या माध्यमातून माहिती संकलित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. शिरोळ तालुक्यातील प्रत्येक गावाला १० लाईफ जॅकेट प्रशासनाच्या वतीने मागील वर्षीच देण्यात आले आहे. तसेच शिरोळ तालुक्यातील वजीर रेस्क्यू फोर्सच्या वतीने महापुराच्या पार्श्वभूमीवर असलेल्या बोटींची डागडुजी व प्रशिक्षणाला सुरुवात करण्यात येणार असल्याचे रऊफ पटेल यांनी सांगितले. तसेच शिरोळ तालुक्यात ११ यांत्रिकी बोटी, १०० लाईफ जॅकेट , १०० लाईफ रिंग

१० ओबीएम मशीन, १८ लाकडी नौका, फ्लोटिंग पंप २, फुट पंप ११, फ्लोटिंग रोप १०० मीटर - १०० नग तसेच वजीर रेस्क्यू फोर्सचे ३४६, आधार फोर्सचे - ४० तर पास रेस्क्यू फोर्सचे ६० असे एकुण ४०० जवान तैनात असून शिरोळ तालुक्यातील कुरुंदवाड येथील एस.पी. हायस्कूल, टाकळीवाडी येथील गुरुदत्त कारखाना, शिरोळ येथील दत्त कारखाना, पदमाराजे विद्यालय, कवठेगुलंद येथील लालबहादूर शास्त्री विद्यालय, जयसिंगपूर शहरातील विविध शाळा यासह शिरोळ तालुक्यातील माळभागावर असणारे शाळा, कॉलेज यांना सूचना देऊन निवारा शेडची व्यवस्था करण्यात आली असल्याचे तहसीलदार अनिलकुमार हेळकर यांनी सांगितले.

### आपत्ती व्यवस्थापनची तयारी पूर्ण

**संभाव्य महापुराच्या पार्श्वभूमीवर शिरोळ तालुक्यातील आपत्ती व्यवस्थापन सज्ज आहे. तालुक्यातील विविध ठिकाणी निवारा शेडची व्यवस्था करण्यात आली आहे. बचावासाठी एनडीआरएफचे जवान तसेच रेस्क्यू फोर्सचे ४०० जवान तैनात करण्यात येणार आहेत. येत्या काही दिवसात अतिवृष्टी सुरू झाली तर कोणीही घाबरून जाऊ नये, कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता आपत्ती व्यवस्थापन यांच्याशी संपर्क साधावा.**

**- अनिलकुमार हेळकर, तहसिलदार शिरोळ**

# साताऱ्यात महाराणा प्रताप जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**सातारा :** महाराणा प्रताप उत्सव समिती व राजपूत समाज याच्या कडून आज रविवार महाराणा प्रताप यांची ४६४वी जयंती राधिका रोड वरिल महाराणा प्रताप चौका मधे साजरी करन्यात आली या ठिकानी भव्य आसा सेट उभाकरून सर्वत्र विद्युत रोशनाई करन्यात आली मान्यवरंच्या हस्ते मूर्ति पूजन व दीपप्रज्वलन करन्यात आले. रक्तदान शिबीर ,डोळ्याची निःशुल्क तपासणी,गुणवंत विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला

सातारा तालुक़ा पोलिस निरीक्षक निलेश काळे साहेब व वाहतुक पोलिस निरीक्षक अभिजीत यादव यांच्या हस्ते मूर्ति पूजन व दीप्प्रज्वलन करन्यात आले.

यावेळी बोलताना पो निरीशक जगदाळे साहेब म्हनाले आपण या महापुरुषाचा आदर्श डोळ्या समोर ठेवला पाहिजे महाराणा प्रताप यांच्यासारखे युग पुरुष परत होने नाही आजच्या तरुणांनी या युगपुरूषांप्रमाणे ध्येय सिध्द असावे बलदंड व उदिष्ट पूर्ण करणारी पिढी रचनात्मक समाज निर्माण करू शकतो.



तसेच वाहतुक पोलिस निरीक्षक यादव यांनी आपण रक्तदान शिबिर घेतल्याने त्याचा एका जरी व्यक्तिचे प्राण आपल्यामुळे वाचलें तरी आयुष्य सार्थ झल्यासारखे वाटते . असे उपक्रम महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्त आपण दर वर्षी घेता त्याबदल त्यानी राजपूत समाजाचे कौतुक केले

यानंतर गुणवत्ता विद्यार्थांचे प्रशस्ति पत्र व ट्रॉफ़ी देउन सत्कार करण्यात आले आभार प्रदर्शन संजयसिंह राजपूत यानीं केले .वीरसिंह परदेशी, अवधूत परदेशी, राजेंद्रसिंह राजपूत, ओंकार परदेशी, महेश राजपूत, अभय परदेशी, नितिन परदेशी, माणिक राजपूत, विनायक राजपूत, मुकुंद परदेशी, शैलेंद्र राजपूत इं यावेळी उपस्थित होते.

# तब्बल ४० वर्षांनंतर पुण्याच्या लोकसभेच्या खासदाराला केंद्रात मंत्रिपद

**पुणे :** पुण्याचे नवनिर्वाचित खा.मुरलीधर मोहोळ यांनी रविवारी रात्री केंद्रीय राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मोहोळ यांच्या रूपात तब्बल चाळीस वर्षांनंतर माजी केंद्रीय मंत्री विठ्ठलराव गाडगीळ यांच्यानंतर पुण्याच्या लोकसभेच्या खासदाराला केंद्रात मंत्रिपद मिळाले आहे. यापूर्वी मंत्री असलेले प्रकाश जावडेकर, सुरेश कलमाडी राज्यसभेतील खासदार होते.

मोहोळ यांना केंद्रात सांस्कृतिक आणि पर्यटन, क्रीडा किंवा नगरविकास विभागापैकी एका विभागाचा पदभार मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मोहोळ यंदा पहिल्यांदाच खासदार झाले असून, पश्चिम महाराष्ट्रातील युवा मराठा नेता म्हणून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा आहे. दरम्यान, मोहोळ यांच्या रूपात मुळशी तालुक्याला पहिल्यांदाच केंद्रीय मंत्रिपद मिळाले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मोहोळ यांनी काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांचा सव्वा लाख मतांनी पराभव केला.


या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रातून पुणे आणि सातारा या दोनच मतदारसंघांत भाजपचे उमेदवार विजयी झाले. त्यामुळे मोहोळ यांना मंत्रिपदाची संधी मिळू शकते, अशी अटकळ बांधली जात होती. रविवारी सकाळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी मोहोळ यांना दूरध्वनी करून मंत्रिपदी संधी दिली जात असल्याचे स्पष्ट केले.

त्यानंतर मोहोळ हे संभाव्य मंत्र्यांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयात बोलावलेल्या बैठकीस उपस्थित होते. पुण्याचे लोकसभेचे खासदार असलेले काकासाहेब गाडगीळ हे १९५२ मध्ये केंद्रात मंत्री होते. त्यांच्यानंतर मोहन धारिया यांची १९७७ साली केंद्रीय मंत्रिमंडळात वर्णी लागली होती.

त्यानंतर १९८४ ला विठ्ठलराव गाडगीळ हे मंत्री झाले होते. विठ्ठलराव गाडगीळ यांच्यानंतर पुण्यातून सुरेश कलमाडी आणि प्रकाश जावडेकर यांची केंद्रीय मंत्रिमंडळात वर्णी लागली असली तरी ते राज्यसभेवर निवडून गेलेले होते. गाडगीळ यांच्यानंतर तब्बल ४० वर्षांनंतर मोहोळ हे केंद्रीय मंत्री झाले आहेत.

नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होत असताना त्यांच्या मंत्रिमंडळात माझी निवड झाली, याचा खूप आनंद आणि समाधान आहे. त्याचबरोबर जबाबदारी आणि कर्तव्यपूर्तीची जाणीवही मनात आहे. वॉर्ड स्तरावरील कार्यकर्ता ते केंद्रीय मंत्री हा प्रवास भाजपमध्येच होऊ शकतो. त्यासाठी मी पक्षनेतृत्वाचा आभारी आहे. खासदार म्हणून पुणेकर आणि मंत्री म्हणून देशसेवेची संधी मला मिळाली आहे. पंतप्रधान मोदींनी दिलेले २०४७ मधील विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मी अहोरात्र काम करीन, असे नवनिर्वाचित केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले.







# सावळजसह परिसरात अतिवृष्टी

## एका दिवसात ११८ मिमी पाऊस ; अग्रणी नदीला पूर ; द्राक्षबागा पाण्यात

**तासगाव :** शनिवारी रात्रीनंतर मध्यरात्रीपर्यंत सावळज (ता. तासगाव) सह परिसरातील गावामध्ये अतिवृष्टी झाली. एका रात्रीमध्ये सावळज मंडळात तब्बल ११८ मिलीमीटर पाऊस पडला आहे. या पावसामुळे ओढे - नाले भरुन वाहते झाल्याने अग्रणी नदीला पूर आला. अनेक गावांच्या हद्दीतील अग्रणी नदी पात्रातील पुलावरून पाणी वाहू लागले होते. या भागातील द्राक्षबागा पावसाच्या पाण्याने तुडूंब भरलेल्या आहेत.

शुक्रवार आणि शनिवारी तासगाव शहर आणि तालुक्यातील सर्व मंडळातील गावांना मुसळधार पावसाने झोडपून काढलेले आहे. तालुक्यात दोन दिवसामध्ये ७५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. हा पाऊस तालुक्यात पडणा-या वार्षिक सरासरी पावसाच्या ११ टक्के एवढा आहे.

तालुक्यात शुक्रवारी ३५ मिलीमीटर पाऊस पडला होता. शनिवारी रात्री पुन्हा जोरदार पावसाला सुरुवात झाली. सावळज मंडळातील गावामध्ये रात्रभर तुफान पाऊस पडत होता. शनिवारी तालुक्यात सरासरी ४० मिलीमीटर पाऊस पडला आहे. मध्यरात्रीच ओढे आणि नाले तुडूंब भरून वाहू लागले होते. मध्यरात्रीनंतर अग्रणी नदीला पूर आला. पहाटेच्या वेळी गव्हाण व मळणगाव हद्दीतील अग्रणी पात्रातील पूल पाण्याखाली गेलेले होते.

शनिवारी रात्रभर तालुक्यातील तासगाव, सावळज, मणेराजुरी, येळावी, विसापूर, मांजर्डे मंडळातील सर्वच गावांना मुसळधार पावसाने झोडपून काढले होते. या पावसामुळे तालुक्यातील अनेक गावामध्ये रस्त्यालगतची झाडे उन्मळून पडली आहेत. अनेक गावांत विजेच्या तारा तुटल्याने विद्यूत पुरवठा खंडित झाला होता.

तालुक्यातील सर्वच गावातील शेतात तुडूंब पाणी भरलेले दिसत होते. द्राक्षबागांचे वाफे पाण्याने भरलेले आहेत. दरम्यान या पावसाचा चांगलाच फायदा येणा-या खरीप हंगामाला होणार आहे. तसेच द्राक्षबागांच्या खरड छाटणी हंगामातील द्राक्ष काडीच्या गर्भधारणेस होणार आहे. जोरदार पडलेल्या पावसामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे असे वातावरण आहे. तर हवेतील उष्णता जाऊन गारवा निर्माण होण्यास या पावसाचा फायदा झाला आहे.

शुक्रवारी आणि शनिवारी तालुक्यात पडलेला मंडळनिहाय पाऊस (मिलीमीटर मध्ये)

| मंडळ | ८/०६/२०२४ | ९/०६/२०२४ |
|---|---|---|
| तासगाव | ३० मिमी | १४ मिमी |
| मणेराजुरी | ४६ मिमी | ४० मिमी |
| सावळज | २६ मिमी | ११८ मिमी |
| विसापूर. | ३४ मिमी | २२ मिमी |
| येळावी | ४७ मिमी | १५ मिमी |
| मांजर्डे | २७ मिमी | ३० मिमी |
| .सरासरी | ३५ मिमी | ४० मिमी |





**मुंबई :** 'धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा मार्गा'वरील मरीन ड्राईव्ह परिसर ते हाजी अली परिसरापर्यंत उत्तर वाहिनी आजपासून खुली करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या बोगद्याची पाहणी केली. यावेळी मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी उपस्थित होते.

# मुंबई कोस्टल रोडचा दुसरा बोगदा वाहतुकीसाठी खुला

## मरीन ड्राईव्ह ते हाजी अली आता आठ मिनिटात : मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून पाहणी

उत्तर वाहिनी मार्गिका खुला केल्यामुळे शहरातील वाहतूक अधिक वेगवान होणार असून सुमारे पाऊण तासांचे हे अंतर अवघ्या १० मिनिटात कापता येणे शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. भुलाभाई देसाई मार्ग, बॅरिस्टर रजनी पटेल चौक आणि वत्सलाबाई देसाई चौक (हाजीअली चौक) पर्यंत जाणे सुलभ होणार आहे.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबईकरांना वाहतूक कोंडीतून दिलासा देणाऱ्या सागरी किनारा मार्गाचा पहिला ९ किलोमीटरचा टप्पा खुला केला होता. आजपासून सव्वा सहा किलोमीटरचा दुसरा टप्पा खुला झाला आहे. सागरी किनारा मार्गाचा नरिमन पॉईंट येथून वरळीपर्यंत जाण्याऱ्या मार्गाची पाहणी केली. नरिमन पॉईंट ते हाजीअलीपर्यंतच्या सव्वा सहा किलोमीटर लांबीचा हा बोगदा आजपासून सुरू करण्यात आला आहे. जुलै महिन्यापर्यंत नरिमन पॉईंट ते वरळी हा सागरी मार्गाचा तिसरा टप्पाही सुरू होईल.

हा बोगदा अत्यंत अद्ययावत पध्दतीने बांधण्यात आला असून अत्यावश्यक परिस्थितीत नियंत्रण कक्षाशी संपर्क करण्यासाठी टेलिफोन देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्वतः या फोनवरुन नियंत्रण कक्षाशी आपत्कालीन परिस्थितीत कशाप्रकारे प्रतिसाद मिळतो त्याची माहिती जाणून घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ॲंटीक कार मधून मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, पवार यांनी प्रवास करीत बोगद्याची पाहणी केली.

# कासच्या स्वच्छतेसाठी एकवटले सातारकरांचे शेकडो हात

**सातारा :** एकच ध्यास स्वच्छ कास असा जयघोष करत आज सातारा नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा सातारकर नागरिकांनी कास तलावाजवळ प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध एल्गार पुकारला. चार तासात सुमारे दोन टन प्लास्टिक कचरा तलावाच्या पाण्यात जाण्यापासून रोखण्यात आज यश आले.

कास तलाव हा सातारकरांचा मानबिंदू आहे. मात्र, तेथे प्लास्टिक कचरा टाकून या मानबिंदूला धक्का लावण्याचा प्रयत्न काही बेशिस्त नागरिक करतात पावसाळ्यामध्ये तलावातील पाणी वाढून हाच प्लास्टिकचा कचरा सातारा शहराची तहान भागवणाऱ्या कास तलावात जातो.

यावर्षी पावसाळ्यात तलावात अधिक पाणीसाठा होणार आहे. प्लास्टिक कच-यामुळे दूषित झालेले पाणी पिण्याचा धोका सातारकरांवर ओढवू शकतो.



हा धोका टाळण्यासाठी सातारा नगरपरिषद व हरित सातारा ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने का स्थला परिसरात आज स्वच्छता मोहीम राबविण्यात आली सकाळी आठ वाजता या मोहिमेला सुरुवात झाली हातमोजे नाकावर मास्क व हातात पोती घेऊन हे स्वच्छता दूत कास तलावाचा काठ तसेच लगतच्या झाडीमध्ये शिरले. तलाव परिसरात खाद्यपदार्थांची वेस्टने, मद्याच्या व पाण्याच्या बाटल्या, मद्याचे कॅन, लहान मुलांचे डायपर, चपला-बूट, प्लास्टिकचे कागद, पत्रावळ्या, सिगरेटच्या पाकिटाची वेस्टने आदी स्वरूपातील प्लास्टिक व इतर कचरा मोठ्या प्रमाणात साचला होता.

स्वच्छता दूतांनी हा कोतकचरा पोत्यामध्ये गोळा करून नगरपालिकेच्या वाहनातून सोनगाव कचरा डेपो मध्ये नेऊन त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यात आली.

कास तलाव परिसर तसेच भिंतीलगतचा भाग या ठिकाणी सुमारे दोन टन प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला.

या मोहिमेमध्ये सतत नगर परिषदेचे वरिष्ठ आरोग्य निरीक्षक प्रकाश राठोड, निरीक्षक प्रवीण यादव, गणेश टोपे, आरोग्य अभियंता नितीन माळवे, हरित साताराचे संजय मिरजकर, भालचंद्र गोताड, उमेश खंडूजोडे, निखिल घोरपडे, संजय झेपले, साईराज पवार, जय गायकवाड, चंद्रसेन फडतरे, इपसा फडतरे, अमृता भोसले आदी उपस्थित होते.

# रामदास आठवले मंत्री झाल्याने सावळजमध्ये आनंदोत्सव

## कार्यकर्त्यांकडून फटाक्यांची आतिषबाजी ; अनेक विकास कामांना गती मिळणार

**तासगांव :** तासगाव तालुक्यातील सावळज येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी तिसऱ्यांदा मंत्री म्हणून शपथ घेतल्या नंतर सावळज येथे फटाक्याची आतिषबाजी व लाडू वाटप करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले आनंदोत्सव साजरा करण्यात आला. एनडीए आघाडीत रामदास आठवले यांना लोकसभा निवडणुकीसाठी एकही जागा मिळाली नव्हती परंतु त्यांनी प्रामाणिक पणे एनडीए ची भूमिका लोकांपर्यंत पोहचून एनडीए आघाडीच्या विजयात मोलाचा वाटा उचलला आहे. सावळज गावाशी रामदास आठवले यांचा कायम स्नेह राहिला असुन त्यांचे बालपण याच गावात गेले आहे. त्यांच्या आईंनी त्यांना अतिशय कष्टाने त्यांना मोठे



केल्याची भावना अनेक ग्रामस्थ आजही व्यक्त करतात.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या माध्यमातून तासगाव तालुक्यातील सामान्य घटकांना केंद्रबिंदू मानून अनेक विकास कामे येणाऱ्या काळात पूर्ण केली जातील. अशी माहिती आरपीआयचे तासगांव तालुकाध्यक्ष प्रवीण धेंडे यांनी यावेळी दिली.

यावेळी, सतिश धेंडे, पांडुरंग भिसे, महावीर धेंडे, मनिष धेंडे, अमित रणखांबे, बाळू धेंडे, सागर शिंदे, पवन भिसे, अनिकेत पवार, राज भिसे, शाहरुख कांबळे, बबलू धेंडे, मनोहर धेंडे, प्रणील भिसे, अक्षय कांबळे , हर्ष धेंडे, संपत भिसे, सुभाष काटे, योगेश काटे, तुषार कांबळे यासह अनेक कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते.